प्रा.अखिलेश शिंदे
*M.A,M.Phil,SET,NET,Ph.D(app.)*
समाजशास्त्र विभाग
महिला महाविद्यालय,कराड

# Topic 4. Application of Sociology
# समाजशास्त्राची उपयोगिता

**A. Sociology as a Profession : Policy, Planning, Teaching and Research**
**व्यावसायिक द्रष्टीने समाजशास्त्र : धोरण, नियोजन, अध्यापन आणि संशोधन**

**B. Career Opportunities: Social Sector (NGO[s] and Social Welfare Departments)**
**करिअर संधी : सामाजिक क्षेत्र (बिगरशासकीय संघटना आणि समाजकल्याण विभाग )**

## Topic 4. Application of Sociology
## उपयोजित समाजशास्त्र

### B. Sociology as a Profession : Policy, Planning, Teaching and Research
### व्यावसायिक द्र्ष्टीने समाजशास्त्र : धोरण, नियोजन, अध्यापन आणि संशोधन

**प्रस्तावना :**

समाजशास्त्र हे एक विज्ञान/शास्त्र आहे.या विज्ञानाचा अभ्यास करून जे ज्ञान व पदवी प्राप्त केली जाते.त्या ज्ञानाचा व पदवीचा उपयोग काय ?समाजशास्त्रीय ज्ञानाचा फायदा काय ?व्यावहारिक जीवनात या ज्ञानाला काय महत्व आहे ? असे अनेक प्रश्न आपल्या मनात निर्माण होऊ शकतात.या दृष्टीने समाजाशात्र हे एक उपयोजित, व्यावसायिक शास्त्र कसे आहे, समाजशास्त्र विषयातून पदवी प्राप्त केल्यास त्याचे व्यावसायिक महत्व कोणते आहे, याचा अभ्यास या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

- **समाजशास्त्र - एक व्यवसाय :**

Profession या शब्दासाठी मराठीत व्यवसाय हा शब्द आपण दैनंदिन जीवनात वापरतो.व्यवसाय म्हणजे निर्वाह चालवण्यासाठी केली जाणारी अर्थार्जनाची क्रिया होय.व्यवसाय म्हणजे असा कामधंदा कि ज्यासाठी उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि शिक्षण घेणे आवश्यक असते.या दृष्टीने समाजशास्त्र हे एक व्यावसायिक शास्त्र आहे.समाजशास्त्र हे समाजाचा सर्वांगीण व पद्धतशीर अभ्यास करते.या अभ्यासानुसार जे ज्ञान मिळते त्या ज्ञानाचा उपयोग एक व्यवसाय म्हणून करता येतो व त्याच्या आधारे निर्वाह देखील करता येतो.त्यामुळे समाजशास्त्राकडे एक व्यवसाय म्हणून पाहता येते.आज समाजशास्त्रातील पदवीधर विविध क्षेत्रात आखाडा रोजगार,कामधंदा मिळवून त्यामध्ये एक व्यावसायिक म्हणून यश प्राप्त करू शकतो.या विविध क्षेत्रापैकी धोरण, नियोजन, अध्यापन आणि संशोधन या चार क्षेत्रांमध्ये समाजशास्त्राचा अभ्यासक व्यावसायिक म्हणून कार्य करू शकतो,ते पुढीलप्रमाणे...

### १.धोरण (Policy) :

कोणतेही कार्य करण्यासाठी किंवा ध्येय साध्य करण्यासाठी प्रथम त्यासंबंधीचे धोरण निश्चित करावे लागते.धोरण हे बहुउद्देशीय स्वरूपाचे असते.समाजातील आवश्यक गरजा लक्षात घेऊन सामाजिक धोरण तयार केले जाते.सामाजिक धोरणाच्या आधारेच सामाजिक परिवर्तन घडवून आणले

जाते.सामाजिक धोरणात बदल देखील केले जातात.अशा प्रकारच्या धोरणाच्या संदर्भात समाजशास्त्राचा अभ्यासक हा एक तज्ञ सल्लागार म्हणून महत्वाचे कार्य करू शकतो.

- **व्याख्या :**

१.**चंद्रकांत खंडागळे :** विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी करावयाच्या कृतीना मार्गदर्शन ठरणाऱ्या तत्वांचा समुच्चय म्हणजे धोरण होय.

२. **डिमोक :** प्रशासकीय निर्णयांना मार्गदर्शन करणारे व जाणीवपूर्वक स्वीकारलेले आचरणाचे नियम म्हणजे धोरण होय.

- **धोरणाच्या संदर्भातील समाजशास्त्रज्ञांचे योगदान/कार्य :**

प्रत्येक समाजात विविध प्रकारची ध्येये असतात व ती साध्य करण्यासाठी धोरणे निश्चित करावी लागतात.उदा.सामाजिक,आर्थिक,राजकीय,शैक्षणिक इ. अशा धोरणांच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञ पुढीलप्रमाणे योगदान देऊ शकतात..

**१.धोरण निर्मिती :**

कोणतेही धोरण ठरविण्यात,धोरणांची निर्मिती करण्यात समाजशास्त्रज्ञ महत्वपूर्ण योगदान देवू शकतात.कोणतेही धोरण यशस्वी होण्यासाठी त्या धोरणाची निर्मिती वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या आधारेच झाली पाहिजे.समाजातील समस्या,सामाजिक स्थिती,संस्कृती याचे ज्ञान समाजशास्त्रज्ञाना असते.त्यामुळे धोरण निर्मिती करताना समाजशास्त्राचे अभ्यासक तज्ञ सल्ला देऊ शकतात.

**२.धोरणाच्या परिणामांविषयी पूर्वकथन :**

एखादे ध्येय साध्य करण्यासाठी अनेक पर्यायी धोरणे निर्माण केली जाऊ शकतात.यामधील कोणत्या धोरणाचे काय परिणाम होतील,कोणते धोरण यशस्वी होईल अथवा होणार नाही याचे पूर्वकथन समाजशास्त्रज्ञ करू शकतात.त्यामुळे अनेक धोरणापैकी कोणते धोरण स्वीकारावे याचा निर्णय घेता येतो.त्यामुळे अशा वेळी समाजशास्त्रज्ञांचा सल्ला मार्गदर्शन महत्वाचे ठरते.

**३. धोरणांची अंमलबजावणी :**

एखाद्या धोरणाच्या अंमलबजावणीच्या कार्यात देखील समाजशास्त्रज्ञ सहभागी होऊ शकतात.एखादे धोरण कसे राबवावे,ते राबवताना येणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक अडथळयावर कशी मात करावी, धोरण राबवताना लोकांना कसे सहभागी करून घ्यावे या संदर्भात समाजशास्त्रज्ञ महत्वपूर्ण कार्य करू शकतात.हे महत्व ओळखूनच अलीकडच्या सामाजिक धोरणांच्या अंमलबजावणी मध्ये मोठ्या प्रमाणात समाजशास्त्रज्ञ सहभागी करून घेतले जात आहेत.

**४.धोरणांचे मूल्यमापन :**

समाजशास्त्रज्ञ हे केवळ धोरण ठरविणे,त्याच्या परिणामांविषयी पूर्वकथन करणे व त्याची अंमलबजावणी करणे या कार्यातच नव्हे तर धोरणाचे मूल्यमापन करण्याच्या कार्यातही महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.एखाद्या धोरणाचे गुणदोष दाखवून देऊन त्याधोरणाचा पुनर्विचार करण्याचा किंवा त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्याचा सल्ला मार्गदर्शन करू शकतात.

**५.आवश्यक माहिती पुरविणे :**

सामजिक धोरण निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी विश्वसनीय माहिती उपलब्ध करून देण्याचे काम देखील समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी केलेले आहे.उदा.लोकासंख्याविषयक धोरण,सामाजिक गतीशोलातेचा अभ्यास इ.

**६.प्रशिक्षण :**

सामाजिक धोरण निर्माण करण्यासाठी व त्याच्या कार्यवाही साठी जे प्रयत्नशील असतात अशा लोकांना प्रशिक्षण देण्याचे काम देखील सामाजाशास्त्रज्ञ यांच्या कडून पूर्ण केले जाते.सामाजिक कार्यकर्ते,शिक्षक,अधिकारी,कामगार या सर्वाना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करण्याचे काम केले जाते.

थोडक्यात आज समाजातील विविध प्रश्न,सामाजिक समस्या,गरजांची पूर्तता,सामाजिक परिवर्तन,प्रगती या सर्व बाबीसाठी धोरण हे आवश्यक आहे.मग ते धोरण सामाजिक,आर्थिक,राजकीय ,शैक्षणिक अशा स्वरूपाचे असू शकते.या धोरणाच्या बाबतीत समाजशास्त्रज्ञ हे वरीलप्रमाणे कार्य,मदत,मार्गदर्शन करू शकतात.हि एक समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी महत्वपूर्ण व्यायसायिक संधी आहे

## २. नियोजन (Planning) :

सद्य स्थितीत नियोजन,सामाजिक नियोजन हि संकल्पना देखील महत्वाची झालेली आहे.आधुनिक समाजात सामाजिक नियोजन हि एक चळवळ,आवश्यक बाबा निर्माण झालेली आहे.सामाजिक परिवर्तनाला निश्चित दिशा देण्यासाठी नियोजन महत्वपूर्ण झालेले आहे.कोणतेही कार्य नियोजनबद्ध केल्यास यशस्वी होऊ शकते असा अनुभव प्राप्त झालेला आहे.त्यामुळे आज व्यक्तिगत सामाजिक कार्य करताना नियोजन करण्यावर भर दिला जात आहे.त्यामुळे नियोजनाच्या बाबतीत देखील समाजशात्रज्ञ महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.

- **व्याख्या :**

**१.किंबॉल यंग :**

एका विशिष्ट दिशेने सामाजिक – सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी मनात बाळगलेले ध्येय अथवा हेतू पूर्ण करण्यासाठी जो कार्यक्रम हाती घेतला जातो त्यास नियोजन असे म्हणतात.

नियोजन हे सामाजिक,आर्थिक,प्रशासकीय इ.प्रकारचे असते.नियोजनात अनेक पर्यायी मार्ग,कार्यक्रम यामधून योग्य पर्यायाची निवड करावयाची असते.नियोजन हि मानवी समाजातील व्यवहार्य क्रिया आहे. व्यक्तिगत व सामुहिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी नियोजन हे आवश्यक असते.या सर्व नियोजनात समाजशास्त्रज्ञ पुढीलप्रमाणे महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.

- **नियोजनाच्या संदर्भातील समाजशास्त्रज्ञांचे योगदान/कार्य :**

कोणत्याही समाजाची विविध ध्येये असतात व ती साध्य करण्यासाठी नियोजन करावे लागते.सामाजीक परिवर्तन आणि सामाजिक नियोजन यांचा खूप जवळचा संबंध आहे.सामाजिक परिवर्तन,सामाजिक विकास यासाठी नियोजन खूप आवश्यक बाब आहे.उदा.भारतातील पंचवार्षिक योजना, नियोजनाच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञ देखील महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.ती पुढीलप्रमाणे..

**१.ध्येय निश्चिती :**

नियोजनाच्या प्रक्रियेत सर्वप्रथम नियोजनाची ध्येये व उद्दिष्टे निश्चित करावी लागतात.हि ध्येये समाजातील जास्तीत जास्त लोकांना मान्य होतील अशा स्वरुपाची असली पाहिजेत.अशा ध्येयाना अनुसरून धोरण आखले तरच ते नियोजन यशस्वी होऊ शकते.कोणत्याही समाजात धर्म,जात,भाषा,लिंग,श्रद्धा,जीवनशैली याबाबतीत भिन्नता असल्याने त्यांची ध्येये विभिन्न असू शकतात.अशा प्रसंगी सर्वमान्य होतील अशी ध्येये निश्चित करण्यात समाजशास्त्रज्ञ मदत करू शकतात.याचे कारण त्यांच्याकडे समाज,समूह यांच्याविषयी वस्तुनिष्ठ ज्ञान असू शकते.त्यामुळे नियोजनाची ध्येये निश्चित केली कि नियोजन प्रबाविप्रे करणे सुलभ होते.या कामात समाजशास्त्रज्ञांची भूमिका योगदान महत्वाचे आहे.

2.**समस्यांचे विश्लेषण :**

नियोजनात निश्चित केलेल्या ध्येयांना अनुसरून काही समस्या असतात त्या समस्यांचे सामाजिक सांस्कृतिक दृष्टीकोनातून विश्लेषण करणे हा दुसरा टप्पा आहे.या समस्यांचा अभ्यास करून त्याचे समाजावारती होणारे परिणाम,त्यावरती उपाययोजना,कारणे याचा अभ्यास करणे आवश्यक असते.समाजशास्त्रज्ञाना

समाजातील समस्यांचे आकलन असल्यामुळे नियोजनाच्या दृष्टीने तज्ञ म्हणून ते समस्यांचे विश्लेषण चांगल्या पद्धतीने करू शकतात.

**३.साधनसामग्रीचे मूल्यमापन :**

नियोजनाच्या प्रक्रियेत उपलब्ध असलेली भौतिक व मानवी साधनसामग्री संघटीत करणे हा तिसरा टप्पा आहे.संघटीत केलेल्या साधनसामग्रीचे मूल्यमापन करणे आवश्यक असते.हे काम देखील समाजशास्त्रज्ञ प्रभावीपणे करू शकतात.उपलब्ध साधनांचा सुयोग्य वापर करणे,साधनांचा समाजावर पडणारा प्रभाव लक्षात घेणे हे काम समाजशास्त्रज्ञ प्रभावीपणे करत असल्याने त्यांचा सल्ला व मार्गदर्शन महत्वाचे ठरते.

**४.धोरणांची आखणी व अंमलबजावणी :**

नियोजनात धोरणांची आखणी करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी विस्तृत योजना तयार करणे हा महत्वाचा टप्पा मानला जातो.यामध्ये समाजशास्त्रज्ञ धोरण ठरविणे,धोरणांची अंमलबजावणी करणे, धोरणाचे पूर्वकथन करणे,धोरणाचे मूल्यमापन करणे अशी महत्वाची कामे पार पाडू शकतात.

**५.योजनेची कार्यवाही :**

धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी केलेल्या योजनेची कार्यवाही करण्यासाठी एखादी संघटना किंवा यंत्रणा उभारणे हा नियोजनातील अंतिम टप्पा आहे.या टप्प्यावर देखील समाजशास्त्रज्ञ महत्वाची भूमिका बजावू शकतात.यंत्रणेत सहभागी होऊन निरीक्षण ठेवू शकतात,यंत्रणेतील दोष दाखवू शकतात.आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन करू शकतात.एकूणच योजनेची कार्यवाही करून नियोजन यशस्वी करण्यात देखील समाजशास्त्रज्ञ महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.

अशा प्रकारे समाजशास्त्रज्ञ हे नियोजनाच्या बाबतीत हि एक तज्ञ सल्लागार व मार्गदर्शक अशा प्रकारची व्यायसायिक भूमिका पार पाडू शकतात.आज अनेक देशात धोरण व नियोजन विषयक कार्यात समाजशास्त्रज्ञाना सहभागी करून घेतले जात आहे.

## ३.अध्यापन (Teaching):

एक व्यवसाय म्हणून अध्यापनाचे क्षेत्र हे समाजशास्त्रज्ञांच्या पदवीधरांसाठी अत्यंत व्यापक व प्रभावी क्षेत्र आहे.समाजशास्त्र विषयातून पदवी व पदावित्तुर पदवी आणि आवश्यक अर्हता पूर्ण केल्यास समाजशास्त्र विषयाचे अध्यापक / शिक्षक म्हणून काम करता येते.भारतात अध्यापनाचा व्यवसाय हा प्राचीन काळापासून चालत आलेला असून त्याला समाजात मोठी प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे.समाजशास्त्राचा पदवीधर हा ज्ञानदानाचे कार्य एक व्यावसायिक म्हणून करू शकतो ,ते पुढीलप्रमाणे ....

- **समाजशास्त्र अध्यापनाच्या क्षेत्रातील व्यावसायिक संधी :**

**१.माध्यमिक स्तर :**

आज अनेक देशांमध्ये समाजशास्त्र हा विषय इतर विषयांच्यासह माध्यमिक स्तरावारती शिकविला जातो.भारतात ही अनेक केंद्रीय विद्यालयात व माध्यमिक शाळांमध्ये इ.८ वी ते इ.१० वी पर्यतच्या वर्गाना समाजशास्त्र हा विषय शिकवला जातो.समाजशास्त्र विषयातील बी.ए ची पदवी व बी.एड हि पदवी घेतल्यास माध्यमिक स्तरावर अध्यापक म्हणून कार्य करता येवू शकते.

**२.उच्च माध्यमिक स्तर :**

भारतात बहुतेक सर्वत्र समाजशास्त्र हा विषय उच्च माध्यमिक / कनिष्ठ स्तरावर म्हणजेच ११ वी व इ.१२ वी या वर्गांना शिकवला जातो.समाजशास्त्रातील पदावीत्तुर  पदवी व बी.एड हि पदवी प्राप्त केलेली व्यक्ती या स्तरावर समाजशास्त्राचे अध्यापन करू शकते.

**३.महाविद्यालयीन स्तर** :

आज सर्वत्र पदवीसाठी समाजशास्त्र हा विषय महाविद्यालयीन स्तरावर ऐच्छिक विषय म्हणून शिकवला जात आहे. समाजशास्त्रातील पदवीत्तुर  पदवी व सेट,नेट परीक्षा पास, पी.एचडी पदवी प्राप्त व्यक्ती महाविद्यालयीन स्तरावर अध्यापनाचे काम करू शकते.

**४.विद्यापीठ स्तर :**

विद्यापीठ स्तरावर देखील समाजशास्त्र हा विषय पदावीत्तुर स्तरावर शिकवला जातो.या स्तरावर अध्यापन करण्यासाठी देखील महाविद्यालयीन स्तराप्रमाणे शैक्षणिक पात्रता आहे. समाजशास्त्रातील पदवीत्तुर  पदवी व सेट,नेट परीक्षा पास, पी.एचडी पदवी प्राप्त  व्यक्ती विद्यापीठ  स्तरावर अध्यापनाचे काम करू शकते.

**५.इतर विद्याशाखा :**

समाजशास्त्र विषयाचे अध्यापन हे भारतात तरी कला/सामाजिक विज्ञान शास्त्र  या शाखेत केले जाते. परंतु आज  या शाखे व्यतिरिक्त इतर शाखांमध्ये देखील हा विषय शिकवला जातो.उदा.कायदा,वैद्यकीय,समाजकार्य,कृषी इ.यावरूनच या विषयाचे महत्व लक्षात येते.

वरीलप्रमाणे समाजशास्त्राचे पदवीधारक किंव समाजशास्त्रज्ञ हे अध्यापनाचा व्यवसाय प्रभावीपणे करू शकतात.

## ४. संशोधन (Research) :

अध्ययनाप्रमाणेच संशोधनाच्या क्षेत्रातही समाजशास्त्रज्ञ हे एक व्यावसायिक म्हणून उत्तम कार्य करू शकतात.समाजशास्त्रज्ञ हे सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात संशोधन करून नवनवीन ज्ञान शोधून काढतात.त्यामुळे मानवी ज्ञानात भर पडते व त्याचा उपयोग समाजासाठी होत असतो.

**व्याख्या :**

**१. रेडमन :**

नवीन ज्ञान मिळवण्यासाठी केलेल्या पद्धतशीर प्रयत्नास संशोधन असे म्हणतात.

समाजशास्त्रात होणारे संशोधन हे सामाजिक संशोधन या प्रकारात मोडते. समाजशास्त्रज्ञ हे सामाजिक संशोधन करण्यासाठी तज्ञ असतात.त्यामुळे ते संशोधनाचे कार्य एक व्यवसाय म्हणून प्रभावीपणे काम करू शकतात.

- **संशोधनाच्या क्षेत्रातील समाजशास्त्रज्ञाना व्यावसायिक संधी :**

**१. शैक्षणिक संस्थासाठी संशोधन :**

स्वातंत्रोत्तर काळात भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या संख्येत मोठी वाढ झालेली आहे.यामधून संशोधन देखिल मोठ्या प्रमाणात केले जात आहे.समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी संशोधन क्षेत्रात असणारी व्यावसायिक संधी पुढीलप्रमाणे .....

**A. संशोधक विद्यार्थी :**

समाजशास्त्राची पदावीत्तुर पदवी प्राप्त केल्यानंतर पुढील संशोधनासाठ दिल्या जाणाऱ्या पदवीला प्रवेश घेऊ शकतात.भारतात एम.फील (Master of Philosophy) व पी.एचडी (Doctor of Philosophy) या पदवी प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला संशोधक विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येतो.विद्यार्थ्यांना संशोधनासाठी UGC आणि ICSSR यासारख्या संस्थाकडून शिष्यवृत्ती दिली जातो.

**B. संशोधक म्हणून कार्य :**

ज्यांनी संशोधनासाठी दिली जाणारी एम.फील व पी.एचडी अशी पदवी प्राप्त केली आहे व जे समाजशास्त्राचे अध्यापक म्हणून कार्य करत आहेत अशा व्यक्तही संशोधनाचे कार्य करू शकतात.यानाही ठराविक अटींची पूर्तता केल्यास संशोधनासाठी निधी दिला जातो.

**२. शिक्षणेतर संस्थासाठी संशोधन :**

समाजशास्त्रज्ञ हे विविध शिक्षणेतर संस्थासाठी संशोधक म्हणून कार्य करू शकतात.उदा.शासनाचे वेगवेगळे विभाग,उद्योग व व्यापार संस्था,बिगरशासकीय संघटना,विमा कंपन्या इ.अशा संस्थाना आपले उद्देश व हितसंबंध पूर्ण करण्यासाठी त्यांना संशोधन करावयाचे असते व ते सामाजाश्स्त्राज्ञाना अर्थसहाय्य देऊन संशोधनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवतात.समाजशास्त्रज्ञ संशोधन करून जे निष्कर्ष उपाय सुचवतात त्याची अंमलबजावणी अशा संस्थाकडून केली जाते.

**३.संशोधक मार्गदर्शक :**

व्यवसायिक भूमिकेतून विचार करता समाजशास्त्रज्ञ संशोधन क्षेत्रात संशोधक मार्गदर्शक म्हणून कार्य करू शकतात.अर्थात त्यांना त्यासाठी निर्धारित शैक्षणिक अर्हता प्राप्त करावी लागते.त्यासाठी विद्यापीठ,संशोधन संस्था यांची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त करावी लागसंशोधक मार्गदर्शक प्राध्यापकास आपल्या नियमित वेतनाशिवाय इतरही काही भौतिक लाभ मिळतात.

वरीलप्रमाणे समाजशास्त्रीय संशोधन क्षेत्रात देखील विविध प्रकारची व्यावसायिक संधी उपलब्ध आहे.

**सारांश :**

वरीलप्रमाणे समाजशास्त्र विषयातील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना धोरण,नियोजन,अध्यापन,संशोधन या क्षेत्रांमध्ये व्यावसायिक संधी उपलब्ध आहे.याशिवाय इतर क्षेत्रांमध्ये देखील समाजशास्त्राच्या पदवी प्राप्त लोकांना विविध प्रकारच्या व्यावसायिक संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने या शास्त्राची विद्यार्थ्यामध्ये लोकप्रियता वाढत चाललेली आहे.

## B. Career Opportunities: Social Sector (NGO$^{S}$ and Social Welfare Departments)
## करिअर संधी : सामाजिक क्षेत्र (बिगरशासकीय संघटना आणि समाजकल्याण विभाग )

- **प्रस्तावना :**

गतिमान समाजाचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.त्याबरोबरच समाजातील बदलत्या परस्थितीनुसार व्यवसाय व करियर संधी यामध्ये देखील बदल होत चालले आहेत.सामाजिक प्रश्नांची जाण समाजशास्त्रज्ञांना असल्यामुळे सामाजिक क्षेत्रात समाजशास्त्रातील पदवीधारकांना करीयरच्या विविध संधी प्राप्त होत आहेत.उदा.प्रशासन व व्यवस्थापन,समाजकार्य,जनसंपर्क,समुदाय विकास,आरोग्य सेवा,सल्ला व मार्गदर्शन,बिगरशासकीय संघटना,समाजकल्याण विभाग इ. यामधील बिगरशासकीय संघटना व समाजकल्याण विभाग यामधील समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना असणारी करियर संधी याठिकाणी आपण अभ्यासणार आहोत.ती पुढीलप्रमाणे....

- **NGO$^{S}$ – Non Government Organization :**
**बिगरशासकीय / अशासकीय संघटनांमधील संधी :**

आज जागतिकीकरणाच्या २१ व्या शतकात समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना बिगरशासकीय किंवा अशासकीय संघटनांमध्ये करियरची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत.त्या अभ्यासण्यापुर्वी संघटना म्हणजे काय ? संघटनांचे प्रकार हे देखील अभ्यासावे लागेल,ते पुढीलप्रमाणे ....

❖ **संघटना - अर्थ व प्रकार :**

एखाद्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी निर्माण केलेली व्यवस्था म्हणजे संघटना होय.संघटनेत अनेक सदस्य असतात.ते सर्व सदस्य परस्परांच्या सहकार्याने आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रयत्न करत असतात.

**व्याख्या :**

**१.टॉलकॉट पार्सन :**

एखादे विशिष्ट्य उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी जाणीवपूर्वक निर्माण केलेली व्यवस्था म्हणजे संघटना होय.

**संघटनेचे प्रकार :**

आपली विविध उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मानवाने विविध संघटना निर्माण केलेल्या आहेत.त्याचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे स्पष्ट केले जातात.

१. औपचारिक संघटना :

२. अनौपचारिक संघटना :
३. आर्थिक संघटना :
४. सामाजिक संघटना :
५. राजकीय संघटना :
६. शासकीय संघटना :
७. अशासकीय / बिगरशासकीय संघटना :

संघटनांचे वरील विविध प्रकार दिसून येतात,त्यापैकी आपणाला याठिकाणी अशासकीय / बिगरशासकीय संघटना याच प्रकाराचा अभ्यास करावयाचा आहे.

- **NGO$^{S}$ – Non Government Organization :**
  **बिगरशासकीय / अशासकीय संघटना :**

सामान्यपणे बिगरशासकीय / अशासकीय संघटना यांना NGO या नावाने ओळखले जाते.अशा संघटना या स्वंयसेवी संघटना असतात.ना नफा स्वरुपात या संघटना काम करत असतात.या संघटनांचे स्वरूप राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असू शकते.या संघटना शासनापासून स्वतंत्र असतात पण त्यांना शासकीय निधी प्राप्त होत असतो.लोक स्वंयस्फूर्तीने या संघटनांची स्थापना करत असतात.या संघटनांकडून लोकहिताची कामे केली जातात त्यामुळे त्यांचा उल्लेख नागरी संघटना असाही केला जातो.मानवतावादी,पर्यावरण,शैक्षणिक,आरोग्य,मानवी हक्क,सामाजिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रात या संघटना काम करत असतात.

**व्याख्या :**

**१.संयुक्त राष्ट्र :**

शासकीय नियंत्रणापासून स्वतंत्र असलेली कोणतीही खाजगी संघटना म्हणजे बिगरशासकीय संघटना होय.

- **समाजशास्त्राच्या पदविधाराकांसाठी बिगरशासकीय / अशासकीय संघटनांतील करियर संधी :**

बिगरशासकीय / अशासकीय संघटना ( NGO) यांची संख्या व कार्यक्षेत्र व्यापक प्रमाणात वाढल्याने समाजशास्त्राच्या पदवीधारकांना या संघटनांमध्ये करीयरच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत.या संघटनांमध्ये पुढीलप्रमाणे काम करण्याची संधी उपलब्ध आहे.....

**१. धोरणकर्ता व नियोजनकार :**

अशासकीय संघटनांकडून विविध प्रकारची समाजउपयोगी धोरणे ठरवली जातात व त्यापद्धतीने त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते. समाजशास्त्राच्या अभ्यासकांकडे समाजाच्या विविध घटकाबद्दल वस्तुनिष्ठ ज्ञान असते. अशासकीय संघटनांना समाजउपयोगी कार्याचे धोरण ठरविण्यासाठी व त्याविषयी नियोजन करण्याच्या कामात ते सहभागी होऊ शकतात.

**२. प्रशासक व व्यवस्थापक :**

अशासकीय संघटनांना प्रशासन व व्यवस्थापन चालवण्यासाठी अनेक प्रशासकीय व व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची गरज असते.समाजशास्त्राचे अभ्यासक या संघटनांमध्ये कुशल प्रशासक व व्यवस्थापक म्हणून कामा करू शकतात याचे कारण म्हणजे सामाजिक संबंध व मानवी वर्तनाचे वैज्ञानिक ज्ञान त्यांच्याजवळ असते.त्यामुळे अशा संघटनांमध्ये प्रशासक व नियोजनकार म्हणून समाजशास्त्राचे अभ्यासक करियर करू शकतात.

**३. संशोधक :**

अशासकीय / बिगरशासकीय संघटनांना आपले उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी समाजातील विविध क्षेत्रात संशोधन करावे लागते.समाजशास्त्राचे अभ्यासक हे संशोधनात तज्ञ असतात.त्यांना संशोधनाचे,तथ्य संकलनाचे,तथ्य विश्लेषणाचे ज्ञान असल्याने ते वस्तुनिष्टपणे संशोधन करू शकतात.समाजशास्त्रज्ञ एक संशोधक म्हणून उत्तमपणे कार्य करू शकतात.त्यामुळेच विविध अशासकीय संघटनांमध्ये समाजशास्त्राचे अभ्यासकच संशोधक म्हणून काम करताना निदर्शनास येतात.

**४. शिक्षक – प्रशिक्षक :**

समाजशास्त्राचे अभ्यासक हे अशासकीय संघटनांमध्ये शिक्षक प्रशिक्षक म्हणून देखील भूमिका पार पाडू शकतात.शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संघटनांमध्ये शिक्षक म्हणून अध्यापनाचे कार्य करू शकतात.तसेच संघटनांची ध्येयधोरणे,योजना,प्रकल्प,कार्यपद्धती इ.प्रशिक्षण इतर सदस्यांना देण्याची जबाबदारी ते पार पाडू शकतात.

**५. जनसंपर्क अधिकारी :**

अशासकीय संघटनांमध्ये जनसंपर्काचे कार्य करण्यासाठी विशेष व्यक्ती किंवा अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते.या पदावर समाजशास्त्राच्या अभ्यासकांची नियुक्तीला प्राधान्य दिले जाते याचे कारण लोकांच्या वर्तनाचे व परस्पर संबंधाचे,त्यांच्या प्रश्न व समस्यांचे योग्य आकलन ते करू शकतात त्यामुळे ते जनतेशी उत्तम प्रकारे संपर्क साधू शकतात.

**६. जाहिरात तज्ञ :**

समाजशास्त्रीय ज्ञानाच्या आधारे जनसंपर्काचे कार्य करणारा समाजशास्त्रज्ञ हा जाहिरात तज्ञ म्हणून देखील काम करू शकतो.कारण त्याला लोकांच्या आवडीनिवडी,इच्छा,आकांक्षा,गरज,समस्या याचे आकलन झालेले असते.त्यामुळे लोकांवर छाप पाडणारी,त्यांना आकर्षित करणारी जाहिरात बनवण्यासाठी व ती प्रसारित करण्यासाठी एक तज्ञ म्हणून कार्य करू शकतात.

**७. सल्लागार व मार्गदर्शक :**

अशासकीय संघटनांना सल्ला व मार्गदर्शन देण्याची भूमिकाही समाजशास्त्रज्ञ पार पाडू शकतात.विशेषता शिक्षण प्रसार,सार्वजनिक आरोग्य,दुर्बल घटकांच्या समस्या सोडवणे इ.क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटनांमध्ये सल्लागार व मार्गदर्शक म्हणून समाजशास्त्रज्ञ कार्य करू शकतात.

वरील प्रमाणे समाजशास्त्राचा पदवीधर हा अशासकीय / बिगरशासकीय संघटनां( NGO) मध्ये विविध प्रकारच्या पदांवरती काम करू शकतो.एक महत्वपूर्ण प्रकारची करीयरची संधी म्हणून या क्षेत्राकडे आज पाहिले जात आहे.

- **Social Welfare Departments :**
  **समाजकल्याण विभागातील संधी :**

अशासकीय / बिगरशासकीय संघटनां( NGO) प्रमाणेच समाजकल्याण विभागात देखील समाजशास्त्राच्या पदवीधारकांसाठी करियरची संधी उपलब्ध आहे.या संधीची माहिती अभ्यासण्यापुर्वी समाजकल्याण या संकल्पनेचा अर्थ अभ्यासने महत्वाचे आहे.तो अर्थ पुढीलप्रमाणे .....

**समाजकल्याण :**

आजच्या आधुनिक काळात समाजकल्याण हि संकल्पना मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झालेली आहे.आज जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली आहे.सामान्यपणे जनतेचे दुख दूर करणे,समाजात न्याय व समता प्रस्थापित करणे,दुर्बल घटकांचा विकास साधने इ.कल्याण

म्हणजे व्यक्ती व समुदयांच्या विविध गरजांची पूर्तता करून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे,त्यांचे जीवनमान सुस्थितीत आणणे असा या संकल्पनेचा अर्थ आहे.

१. **फ्रेंडलँडर :**

समाधानकारक जीवनमान व आरोग्य प्राप्त करण्यासाठी व्यक्ती व समूहांना मदत करण्यासाठी निर्माण केलेल्या सामाजिक सेवा व संस्था यांची संघटीत व्यवस्था म्हणजे समाजकल्याण होय.

भारतीय समाजाच्या संदर्भात सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या अनुसूचित जाती व जमाती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती,आर्थिक दृष्ट्या गरीब असलेले घटक,महिला,बालके,शारीरिक व मानसिक दिव्यांग,इ.लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केल्या जाणाऱ्या कार्याचा समावेश समाजकल्याण या संकल्पनेत केल केला जातो.

➢ **समाजशास्त्राच्या पदविधाराकांसाठी समाजकल्याण विभागातील करियर संधी :**

शासनसंस्थेचे समाजकल्याणाचे कार्य विविध विभागामार्फत सुरु असते.या विभागात समाजशास्त्राचा पदवीधर आपले करियर करू शकतो.समाजशास्त्रात अनुसूचित जाती व जमाती ,विमुक्त जाती व जमाती,भटक्या जाती,मागास वर्ग,महिला व बालके,वृद्धजन,इ.घटकांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.त्यामुळे या ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठी होऊ शकत असतो.त्यामुळे समाजकल्याणाच्या विविध विभागात समाजशास्त्राच्या अभ्यासकांना प्राधान्याने संधी मिळत आहे.समाजकल्याण विभागातील करियर संधी पुढीलप्रमाणे ......

१. **सामाजिक न्याय विभाग :**

समाजशास्त्राचा पदवीधर हा समाजकार्यातील पदव्यूत्तर पदवी (M.S.W) प्राप्त करून विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्यास समाजकल्याण अधिकारी व तत्सम पदे प्राप्त करू शकतो.तसेच या विभागात इतर अन्य अनेक पदांचा समावेश होतो, त्या पदांवर देखील समाजशास्त्राच्या अभ्यासकांना मोठ्या प्रमाणात संधी प्राप्त होऊ शकते.

२. **आदिवासी कल्याण विभाग :**

समाजशास्त्रात आदिवासी समाजाचा देखील सखोल अभ्यास केला जातो.त्यामुळे समाजशास्त्राच्या अभ्यासकांना आदिवासी समाजाविषयी वस्तुनिष्ठ ज्ञान असते.त्यामुळे समाजशास्त्रातील पदवीधर हे आदिवासी कल्याण अधिकारी व तत्सम पदांवर काम करू शकतात.आदिवासी समुदाय विकासासाठी अनेक शासकीय योजना,उपक्रम राबवले जातात.या योजनांच्या अंमलबजावणी साठी विविध स्तरावर काम करण्याची संधी असते त्याठिकाणी देखील समाजशास्त्राच्या अभ्यासकांना करीयरची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

३. **कामगार कल्याण विभाग :**

औद्योगिक समाजशास्त्र हि समाजशास्त्रातील एक महत्वपूर्ण शाखा आहे.या शाखेत कामगार कल्याण ,कामगार संघटना, औद्योगिक समस्या,औद्योगिक संघर्ष इ.अभ्यास केला जातो.त्यामुळे कामगार कल्याण विभाग,औद्योगिक अधिकारी अशा पदांवर तज्ञ म्हणून समाजशास्त्राचे पदवीधर काम करू शकतात.

४. **महिला व बाल कल्याण विभाग :**

भारतीय समाज हा पुरुषप्रधान समाज असल्याने सार्वजनिक क्षेत्रात सहभागी होण्याची संधी स्त्रियांना अल्प प्रमाणातच मिळालेली आहे.परिणामी स्त्रिया या वंचित मागास राहिलेल्या दिसून येतात.त्यामुळे स्त्रियांना पुरुषांप्रमाणे हक्क प्राप्त करून देण्यासाठी त्यांच्या कल्याणाचे विकासासासाठी प्रयत्न केले जात आहेत.यामधूनच महिला व बालकल्याण हा विभाग स्थापन झालेला आहे.या विभागात देखील समाजशास्त्राच्या पदवीधराना करीयरची संधी आहे.महिला वसतिगृह,बालानिरीक्षण गृह,बालगृहे,पालकगृहे ,अंगणवाडी व बालसंगोपन केंद्राचे पर्यवेक्षण इ.पदांवरती काम करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे.

- **सारांश :**

शासकीय स्तरावरील विविध कल्याणकारी विभागात समाजशास्त्राच्या अभ्यासकांना वरीलप्रमाणे करीयरची संधी उपलब्ध झालेली आहे.वरीलप्रमाणे समाजशास्त्राच्या अभ्यासकांना बिगरशासकीय / अशासकीय संघटनां व समाजकल्याण विभागात करियर संधी मोठ्या प्रमाणात आहे.

**प्रश्न :**

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. एक व्यावसायिक संधी म्हणून धोरणाच्या बाबतीत समाजशास्त्रज्ञांचे योगदान किंवा कार्य स्पष्ट करा ?
२. एक व्यावसायिक संधी म्हणून नियोजनाच्या बाबतीत समाजशास्त्रज्ञांचे योगदान किंवा कार्य स्पष्ट करा ?
३. अध्यापन क्षेत्रात समाजशास्त्राच्या अभ्यासकांना असणारी व्यवसायिक संधी स्पष्ट करा ?
४. संशोधन क्षेत्रात समाजशास्त्राच्या अभ्यासकांना असणारी व्यवसायिक संधी स्पष्ट करा ?
५. बिगरशासकीय किंवा अशासकीय संघटनांमध्ये समाजशास्त्राच्या पदवीधारकांना असणारी करीयरची संधी स्पष्ट करा ?
६. समाजकल्याण विभागात समाजशास्त्राच्या पदवीधारकांना असणारी करीयरची संधी स्पष्ट करा ?

- **टीपा लिहा ?**

१. धोरण निर्मिती मधील समाजशास्त्रज्ञांचे योगदान
२. सामाजिक नियोजना मधील समाजशास्त्रज्ञांचे कार्य
३. अध्यापन क्षेत्रातील व्यावसायिक संधी
४. संशोधनातील समाजशास्त्रज्ञांचे योगदान
५. बिगरशासकीय किंवा अशासकीय संघटनांमधील करियर संधी
६. समाजकल्याण विभागातील समाजशास्त्राच्या पदवीधारकांना असणारी करीयरची संधी